पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शिक्षण समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ११
सभावृत्तांत

दिनांक – १६/०१/२०२० वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १६/०१/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.वैशाली जालिंदर काळभोर
४. मा.सुलक्षणा राजू धर
५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
६. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बंडागळे – लेखाधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वरधारा म्यूझिक अकॅडमी संगीत शिक्षण जीवन कौशल्य शिक्षण उपक्रम प्रायोगिक तत्वावर राबविण्याबाबत - मा.चंदा लोखंडे, मा.रेशा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२)पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत रेडिओ पुणेरी आवाज १०७.८ एफ.एम.कडून संगीत शिक्षणाचे धडे व प्रशिक्षण देणेबाबत - मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) अतिरिक्त म्हणून आलेल्या शिक्षकांची भरती न करणेबाबत - मा.भाऊसाहेब भोईर, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) हिंदी माध्यम व उर्दू माध्यम रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत – मा.वैशाली काळभोर, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०२/०१/२०२० व ०४/०१/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक -१

दिनांक - १६/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास होणेकामी अवंती एड्टेक सर्व्हिसेस अंतर्गत स्वराधारा म्यूझिक अकॅडमी यांचेमार्फत जीवन कौशल्य अभ्यासक्रम राबविण्यात यावा. अवंती एड्टेक सर्व्हिसेस एलएलपी ही संस्था स्टार्ट अप इंडिया अंतर्गत प्रमाणित असून स्वरधारा म्यूझिक अकॅडमीची स्थापना हया संस्थे अंतर्गत करण्यात आली असून तिचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य शिक्षण प्रदान करणे असून त्याची सुरुवात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामधून होत आहे व्यक्ति विकास, शास्त्रीय संगीताबद्दल जनजागृती, एकंदर अभ्यास व शिकवण्याची पध्दत सक्षम व्हावी असा प्रयत्न हया उपक्रमाचा आहे. लहान वयात शास्त्रीय संगीताचा अभ्यास मुलांच्या विकासाला बळ व चालना देतो. मेंदूतील अश्या भागांना चालना मिळते ज्यांनी निर्णयक्षमता निरीक्षणाक्षमता,एकाग्रता व संवदनशीलात वाढून व्यक्तिमत्व विकासात व आम्तविश्वासात भर पडते. संगीताच्या माध्यमातून खरा आनंद प्राप्त करुन घेण्यासाठी सुध्दा सुर, ताल, लय व एकंदरीत सगळे शास्त्र  नीट समजून संगीत ऐकणे गरजेचे असते. त्याने आनंद कैक पटीने वाढतो व एक दर्जेदार रसरंजन होऊ शकते. सध्याची शाळांमधील संगीत हया कलेच्या अभ्यासाची परिस्थिती सुधारणे गरजेचे आहे. कारण अभ्यासक्रमाची पाठयपुस्तक किंवा मोठया प्रमाणावर नीट शिकवण्याची साधनं उपलब्ध नाहीत. स्वरधाराने हे कार्य करण्याचे सगळया शाळांमध्ये वापरता येतील अशी पाठयपुस्तके व साऊंड ट्रक्स आणि गरज असले तिथे संगीत शिक्षकांची टीम असा प्रकल्प तयार केला आहे. हा पुस्तक आणि साऊंड ट्रक्स संच प्रत्येक विद्यार्थ्यांकडे पोचला व त्याचे शिक्षण शाळांमधून सुरु झाले तर वरील सर्व उद्दिष्ठ सहज साध्य होतील असे नमूद केले आहे. इयत्ता दुसरी ते इयत्ता सातवी पर्यंत विद्यार्थ्याना हा अभ्यासक्रम वापरुन हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे प्राथमिक शिक्षण देता येऊन त्यांना संगीत साक्षर करणे हे ध्येय ही पुस्तकमाला साध्य करून देते. शाळांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत शिक्षण सक्षम करण्यासाठी पाठयपुस्तक आणि साऊंड ट्रॅक तयार करण्यात आली आहे.  हा संच वापरून

संगीत शिकविण्याची पध्दत संगीत शिक्षकांना समजावून संगीत शिक्षणाचे नियोजन करुन देणेत येते. मुलांना सर्वांगीन व्यक्तीमत्व विकास, हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत स्वस्त, सोपे आणि सहज उपलब्ध करुन जनजागृती करणे व सर्वांना एक सुंदर अश्या सांस्कृतिक घटकाची ओळख करवून त्याचा प्रसार करणे ह्या कलेची जोपासना करणा-या कलाकारांना उत्तम भविष्य मिळवून देणे. स्वरधारा अकॅडमीच्या ह्या उपक्रमांत अतिअल्प वार्षिक खर्चात मुलांना हे शिक्षण शाळांमधून उपलब्ध करुन देण्यास तसेच पुस्तके आणि साऊंड ट्रक संच किंमत मात्र र.रु.३००/- वर्षाचे प्रति विद्यार्थी, साऊंड ट्रक्स संच आणि शिक्षक मिळून प्रती विद्यार्थी ५००/- वर्षिक खर्च अपेक्षित आहे. शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु करणेकामी व होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक - २

दिनांक - १६/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरीता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास होणेकामी व त्यांना उज्वल भविष्य मिळावे. पिंपरी चिंचवड शहराच्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास होणेकामी पुणेरी आवाज १०७.८ एफ.एम.कडून मोफत संगीत शिक्षणाचे धडे व प्रशिक्षण रेडीओ मार्फत देण्यात येणार असून वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना सरकारमान्य संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही शाळेची गोडी निर्माण होण्यास मदत होईल व मनपा प्राथमिक शाळेकडे विद्यार्थ्यांचा कल जास्त वाढून विद्यार्थी पटसंख्येत वाढ होईल. याकरीता सर्व प्राथमिक शाळांतील विद्यार्थांना मोफत रेडीओ पुणेरी आवाज १०७.८ एफ एम कडून संगीत शिक्षणाचे धडे व प्रशिक्षण देणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४२ विषय क्रमांक - ३

दिनांक - १६/०१/२०२०

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

मा.भाऊसाहेब भोईर, मा.वैशाली काळभोर यांनी प्रस्तावित केलेनुसार शिक्षण समिती मध्ये शिक्षक भरती करताना शासनाकडून अतिरिक्त म्हणून पाठविलेल्या शिक्षकांची भरती न करता रितसर जाहिरात देऊन शिक्षक भरती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच एकाच

शाळेत तीन वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांच्या नियमित बदल्या करण्यास मान्यता देणेत येत आहे. पर्यवेक्षकपदे भरतांना नियमाप्रमाणे सेवा ज्येष्ठतेने भरणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४३ विषय क्रमांक - ४

दिनांक - १६/०१/२०२०

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.वैशाली काळभोर, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागात उर्दू माध्यमाच्या ४३ जागा व हिंदी माध्यमाच्या १५ जागा रोस्टर पूर्ण करुन रितसर शासन नियमानुसार भरती करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३४/२०२०
दिनांक : १८/०१/२०२०



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.